MHAH080023082017

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१३५७/२०१७</u>**

## निशाणी क्र.२९अ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.1 याने त्याचे विरूध्द सदरहु प्रतिदावा विना कैफियत चालविण्याचा झालेला हुकूम रद्यबातल होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. तो अशी विनंती करतो की, तो मुळ दाव्यातील वादी असुन त्याला प्रतिदाव्यात मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. त्याची पत्नी कॅन्सर या आजाराने ग्रस्त असुन तिचेवर औषधोउपचार सुरू आहे. कोरोनाचे प्रार्दुभावामुळे व त्याचे घरात कोरोना ग्रस्त रूग्ण असल्यामुळे त्याला प्रतिदाव्यावर कैफियत देणे शक्य झाले नाही. तो असे नमुद करतोकी, प्रतिदाव्यावर कैफियत देणेकामी त्याने जाणुनबुजुन उशिर केलेला नाही. त्याला त्याची कैफियत देण्याकामी विलंब झाला व त्याचे कैफियती शिवाय प्रतिदावा चालविणेचा हुकूम पारीत करण्यात आला. सदरहु हुकूम रद्यबातल व्हावा अशी तो विनंती करतो.

३. याउलट मुळ प्रतिवादीतर्फे विव्दान वकीलांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवुन अर्जास आक्षेप नोंदविला. ते असे नमुद करतात की, सदरहु अर्ज खरा व कायदेशीर नाही. तसेच अर्जात नमुद केलेले कारण संयुक्तिक नाही. कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच निशाणी क्र.२७ वरील आदेशानुसार पुर्तता केलेली नाही. सबब अर्ज रद्द करण्यात यावा. वैकल्पिकरित्या अर्ज मंजुर करावा असे न्यायालयोच मत झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी.

४. मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा व प्रतिदावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ याचे विरुध्द प्रतिदावा विना कैफियत चालविण्याचा झालेला हुकूम रद्य करणे न्यायोचित ठरेल. प्रतिवादी क्र.१ याने सदरहु अर्जासोबत त्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यामध्ये प्रतिदाव्यात कैफियत दाखल करण्यास त्याने जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. माझ्या मते प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ याचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास प्रतिदाव्यातील वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ याचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो :-

**<u>आदेश</u>**

प्रतिवादी क्र.१ याचे विरुध्द पारीत करण्यात आलेला प्रतिदावा विनाकैफियत चालविण्याचा आदेश रक्कम रु.१,५००/- (रूपये एक हजार पाचशे मात्र) पुढील तारखेपर्यंत सरकार जमा करण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

SWAPNALI METHAJI WAGHAMARE Digitally signed by SWAPNALI METHAJI WAGHAMARE Date: 2023.04.06 11:38:05 +0530

(स्वप्नाली एम. वाघमारे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

दिनांक : ०५/०४/२०२२